17 OCT 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी विद्यापीठाची ३ टेम्पो मदत रवाना

## 'एनएसएस'च्या मदतीमध्ये ५७५ किलो गहू, २९६ किलो ज्वारी, २५७ किलो तांदूळसह जीवनावश्यक वस्तू

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून सोलापूरसह मराठवाडा भागात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक साहित्यांची ३ टेम्पोतून मदत पाठवण्यात आली. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमधून शिधा, कपडे, जीवनावश्यक सामग्री रवाना करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे मदतीचे टेम्पो रवाना झाले.

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. सोलापूर, मराठवाड्यातील आपद्ग्रस्तांना मदतीसाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने पुढाकार घेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत विशेष मदत संकलन मोहीम राबवली होती. त्यांतर्गत या जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील एनएसएसचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



कोल्हापूर : विद्यापीठातर्फे मदत रवाना करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. तानाजी चौगुले, गजानन पळसे, डॉ. संदीप पाटील आदी.

स्वयंसेवकांनी अन्नधान्य, कपडे, दैनंदिन गरजेच्या वस्तूंसह शैक्षणिक साहित्य संकलित केले. यामध्ये ५७५ किलो गहू, २९६ किलो ज्वारी, २५७ किलो तांदूळ, २० किलो मूगडाळ, ५० किलो हरभरा डाळ, ७० किलो साखर, १०० किलो रवा, १०० किलो आटा, २० किलो गूळ, २० किलो शेंगदाणे, १० बॉक्स साबण, १० बॉक्स तेलाच्या बाटल्या, १० बॉक्स मारी बिस्कीट, १० बॉक्स, पार्ले बिस्कीट १२ पाकिटे, ग्लुकोज डी, १५ पोती कपडे, भांडी आणि वह्यांचा समावेश आहे.

कुलसचिव डॉ. शिंदे मार्गदर्शन केले. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. संदीप पाटील, डॉ. सचिन चव्हाण, सुजित मुंडे, सुरेखा आडके उपस्थित होते.

17 OCT 2025

पुण्यनगरी

# आपद्ग्रस्तांसाठी शिवाजी विद्यापीठाकडून मदत रवाना



कोल्हापूर : आपद्ग्रस्तांसाठी विद्यापीठाकडून मदत रवाना करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह मान्यवर.

**कोल्हापूर :** महाराष्ट्रात सोलापूरसह मराठवाडा भागात अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या आपत्ती काळात आपद्ग्रस्तांसाठी शिवाजी विद्यापीठाने मदतीचा हात पुढे केला आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांमधून तीन टेम्पो शिधा, कपडे व अन्य जीवनावश्यक सामग्री रवाना करण्यात आली. या उपक्रमाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी कौतुक केले.

या मोहिमेत तीनही जिल्ह्यांतील स्वयंसेवकांनी परिसरातून अन्नधान्य, कपडे, दैनंदिन गरजेच्या वस्तू, तसेच शैक्षणिक साहित्य संकलित केले. यामध्ये ५७५ किलो गहू, २९६ किलो ज्वारी, २५७ किलो तांदूळ, २० किलो मूगडाळ, ५० किलो हरभराडाळ, ७० किलो साखर, १०० किलो रवा, १०० किलो आटा, २० किलो गूळ, २० किलो शेंगदाणे, १० बॉक्स साबण, १० बॉक्स तेलाच्या बाटल्या, १० बॉक्स मारी बिस्कीट, १० बॉक्स पार्ले बिस्कीट, १२ पाकिटे ग्लुकोज डी, १५ पोती कपडे, भांडी आणि वह्या यांचा समावेश आहे. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी केले. मदत रवाना करताना डॉ. चौगुले यांच्यासह उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. संदीप पाटील, डॉ. सचिन चव्हाण, सुजित मुंडे, सुरेखा आडके आदी उपस्थित होते.

1 7 OCT 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धरण फुटण्याआधी यंत्र देणार धोक्याचा इशारा

## मिळाले जर्मन पेटंट : संशोधकांनी शोधली अत्याधुनिक प्रणाली

लोकमत न्यूज नेटवर्क



तुकाराम डोंगळे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी धरणफुटीचा धोका ओळखून इशारा देणाऱ्या यंत्रणेविषयी केलेल्या संशोधनाला जर्मन पेटंट मंजूर झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे भविष्यात धरणभंग आणि पूर आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.





शुभम गिरीगोसावी सचिन पन्हाळकर





परेश मट्टीकल्ली गणेश न्हिवेकर

विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील संशोधक शुभम तानाजी गिरीगोसावी, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील प्रा. परेश मट्टीकल्ली, सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातील डॉ. गणेश सुनील न्हिवेकर आणि विद्यापीठाच्या नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. तुकाराम डोंगळे यांनी या संदर्भातील संशोधन केले. या संशोधकांनी 'ॲन इंटिग्रेटेड सिस्टीम फॉर दि डिटेक्शन ऑफ डॅम ब्रिचेस, अर्ली वॉर्निंग अँड इव्हॅक्युएशन असिस्टंन्स' या शीर्षकाने अभिनव संशोधन केले. या अत्याधुनिक प्रणालीद्वारे धरण फुटीचा धोका लवकर ओळखता येतो. त्याद्वारे नागरिकांना तत्काळ इशारा देणे आणि नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतरास मदत करणे या बाबी तातडीने करता येऊ शकतात. प्रकल्प संशोधक शुभम गिरीगोसावी यांनी या मॉडेलचे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रात्यक्षिक सादर केले असून या अभिनव प्रणालीला विविध तज्ज्ञ संस्थांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या कार्यासाठी त्यांना दोन राष्ट्रीय आणि एक आंतरराष्ट्रीय असे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.या संशोधकांचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

1 7 OCT 2025
तरुण भारत

# फुड बिझनेस कार्यशाळा विद्यापीठात उत्साहात

**कोल्हापूर** : जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे फूड बिजनेस कार्यशाळा गुरूवारी झाली. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. कार्यशाळेत अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त यु. एस. लोहकरे, अन्नसुरक्षा अधिकारी विजय पाचपुते यांनी माहिती दिली. डॉ. पी. के. पवार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अभिजीत गाताडे यांनी नियोजन केले. डॉ. हर्षवर्धन कांबळे यांनी आढावा घेतला. डॉ. अश्विनी देशमुख यांनी आभार मानले.

17 OCT 2025

सकाळ



**कोल्हापूर** : विभागीय जलतरण स्पर्धेत यश मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकी, तंत्रज्ञान विभागाचा जलतरणपटू धैर्यशील भोसले याचा सत्कार कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. शेजारी मान्यवर.

# अभियांत्रिकी, तंत्रज्ञान विभागाचे जलतरणमध्ये यश

कोल्हापूर, ता. १६ : कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेंतर्गत राधानगरी महाविद्यालय व शाहू कॉलेजतर्फे आयोजित विभागीय जलतरण स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकी तंत्रज्ञान अधिविभागाच्या जलतरणपटूंनी यश मिळवले.

स्पर्धेत विभागाच्या धैर्यशील भोसलेने आठ सुवर्ण, चार रौप्य आणि एक ब्राँझ अशी १३ पदके मिळवली. सिद्धेश शेलारने एक सुवर्ण, एक रौप्यपदक मिळवले. या दोघांच्या कामगिरीमुळे संघास सर्वसाधारण विजेतपद मिळाले. संघाला विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर, प्रा. प्रवीण सावंत यांचे प्रोत्साहन मिळाले.

17 OCT 2025
पुण्यनगरी

# वाचनाने जीवनविषयक अनुभवांचा परीघ विस्तार: विमल मोरे

**कोल्हापूर :** वाचन आपल्या जीवनविषयक आणि पर्यायाने साहित्यविषयक अनुभवांचा परीघ रुंदावणारे असते, असे मत प्रसिद्ध लेखिका विमल मोरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी होते. विमल मोरे यांनी आपल्या मनोगतातून आपले जीवनविषयक अनुभव आणि साहित्य निर्मितीची प्रक्रिया उलगडून दाखवली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. संविधानातील 'मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये' याविषयी या निमित्ताने चर्चा झाली. त्याचप्रमाणे मराठी आणि हिंदी भाषेतील कुसुमाग्रज, सतीश काळसेकर, सफदर हाशमी, किशोर कदम, दासू वैद्य यासारख्या महत्त्वाच्या लेखकांच्या निवडक कविता आणि गद्य साहित्य कृतीमधील महत्त्वाच्या अंशांचे वाचन करण्यात आले. वाचन आणि त्यातून निर्माण होणारी साहित्य आणि जीवनविषयक प्रगाढ आस्था हे या सर्व कवितांमधले महत्त्वाचे सूत्र होते. या कार्यक्रमाला लेखक धनाजी माळी यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी विभागातील स्मिता राजमाने, कविता ननवरे, ज्योती वराळे, अनुराधा पाटील, सुखदेव एकल, मंदार पाटील, राजेश मोरे, गौरी कुंभार, दत्ता बिरुनगी, करुणा उकिरडे, विष्णू पावले, रूपाली पाटील यांनी पुस्तकांविषयीच्या निवडक कवितांचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले, तर श्रीराम मोहिते यांनी आभार मानले.

पुढारी

# वाचनाने जीवनविषयक अनुभवांचा परीघ विस्तार : विमल मोरे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

वाचन आपल्या जीवनविषयक आणि पर्यायाने साहित्यविषयक अनुभवांचा परीघ रुंदावणारे असते, असे मत प्रसिद्ध लेखिका विमल मोरे यांनी व्यक्त केले. माजी राष्ट्रपती भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. रणधीर शिंदे होते. यावेळी धनाजी माळी उपस्थित होते. याप्रसंगी स्मिता राजमाने, कविता ननवरे, ज्योती वराळे, अनुराधा पाटील, सुखदेव एकल, मंदार पाटील, राजेश मोरे, गौरी कुंभार, दत्ता बिरुनगी, करुणा उकिरडे, विष्णू पावले, रुपाली पाटील यांनी पुस्तकांविषयीच्या निवडक कवितांचे वाचन केले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेतून यशस्वी बुद्धिबळपटूंच्या निवडलेल्या महिला व पुरुष संघासोबत शिवाजी विद्यापीठ बुद्धिबळ संघ निवड समितीचे चेअरमन किरण पाटील, स्मिता कुंभार, राहुल लहाने, सुरेश धुरे, भरत चौगुले व मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेत आदित्य, शर्वरी प्रथम

- ऋषिकेश, सृष्टीने मिळवले उपविजेते
- स्पर्धेतून निवड महिला व पुरुष संघ
- आगामी काळातील आंतरविद्यापीठ स्पर्धेत करणार प्रतिनिधीत्व

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेतील पुरुष गटात शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाच्या आदित्य सावळकरने पाचपैकी साडेचार गुण प्राप्त करत जेतेपदावर आपले नाव कोरले. विवेकानंद महाविद्यालयाच्या ऋषिकेश कबनूरकरनेही चार गुणांसह टायब्रेकमधून मिळवलेल्या साडेबारा गुणांच्या जोरावर उपविजेतेपद प्राप्त केले. तसेच महिला गटात केआयटी कॉलेजच्या शर्वरी कबनूरकरने पाच पैकी साडेचार गुण कमवून अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या सृष्टी कुलकर्णीने ४ गुणांसह टायब्रेकमधून मिळालेल्या १४ गुणांच्या जोरावर उपविजेतेपद मिळविले.

सायबर ट्रस्ट संचलित नॉन कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन्स कॉलेजमध्ये या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये शिवाजी विद्यापीठ अखत्यारीत असलेल्या कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांमधून ३६ महिला व पुरुष बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. यापैकी १५ बुद्धिबळपटू हे आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त होते. राज्यपाल नियुक्त शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन कमिटीचे सदस्य सिद्धार्थ शिंदे व वुमन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर जी. कुलकर्णी यांनी बुद्धिबळाच्या पटावर चाल करून स्पर्धेचे उद्घाटन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठ बुद्धिबळ संघ निवड समितीचे चेअरमन किरण पाटील (कोल्हापूर), सदस्य स्मिता कुंभार (सातारा) व राहुल लहाने (भोगावती), स्पर्धा निरीक्षक सुरेश धुरे (गडहिंग्लज), आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, सायबर वुमन्स कॉलेजच्या शारीरिक शिक्षण संचालिका रामेश्वरी गुंजीकर, केआयटी कॉलेजचे विजय रोकडे, सातारा येथील गौतम घुणके, डॉ. विद्या पाटील व चेस असोसिएशन कोल्हापूरचे मनीष मारुलकर, आरती मोदी व उत्कर्ष लोमटे आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या उद्घाटनानंतर महिला व पुरुष गटात प्रत्येकी ५ फेऱ्यांमध्ये स्पर्धा झाली. यापैकी पुरुष गटात सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमधील श्रीरंग बोंडलेने ४ गुणांसह ट्रायब्रेकमधून मिळवलेल्या १२ गुणांच्या जोरावर तिसरा क्रमांक मिळवला. तसेच कोल्हापुरातील कॉमर्स कॉलेजच्या सारंग पाटीलने चौथा, सांगलीतील वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या आदित्य टिळकने पाचवा आणि कराड येथील एस. जी. एम. कॉलेजच्या साहिल सावंतने सहावा क्रमांक मिळवला. याचबरोबर महिला गटात कोल्हापुरातील कॉमर्स कॉलेजच्या वैष्णवी पाटीलने ४ गुणांसह टायब्रेकमधून मिळालेल्या १३ गुणांच्या जोरावर तिसरा क्रमांक मिळवला. सायबर कॉलेजच्या मयुरी सावळकरने चौथा, इचलकरंजीतील डीकेटीई टेक्स्टाईल कॉलेजच्या दिशा पाटीलने पाचवा आणि व कराड येथील एस. जी. एम. कॉलेजच्या साक्षी पाटीलने सहावा क्रमांक मिळवला.

स्पर्धेनंतर शिवाजी विद्यापीठ पुरुष व महिला बुद्धिबळ संघ जाहीर करण्यात आला. यामध्ये पुरुष व महिला गटामध्ये पहिल्या सहा यशस्वी बुद्धिबळपटूंना विद्यापीठ स्थान देण्यात आले आहे. हा संघ आगामी काळात होणाऱ्या आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी करण्यात येणार आहे. बक्षीस वितरण समारंभात वरील स्पर्धेतील यशस्वी १२ जणांना चषक देऊन गौरविले. नॉन कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते सर्वांनी बक्षीसे स्वीकारली. यावेळी स्पर्धा निरीक्षक सुरेश धुरे, सायबर वुमेन्स् कॉलेजच्या शारीरिक शिक्षण संचालिका रामेश्वरी गुंजीकर, डॉ. विकास जाधव, डॉ. विद्या पाटील व सुप्रिया केळकर आदी उपस्थित होते.